# ठाणे महानगरपालिका,ठाणे

जाहिरात

**सरळ सेवा भरती-२०१६**

**भरतीप्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना**

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खाली नमूद केलेल्या संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाने भरण्यासाठी प्रस्तूत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून www.thanecity.gov.in व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर ऑन लाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

**ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भी वेळा पत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक | दिनांक २६/११/२०१६ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १५/१२/२०१६ रोजी २३.५९ वा.पर्यंत |
| ३ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या शाखेमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | दिनांक २६/११/२०१६ ते दिनांक १६/१२/२०१६ |

**१. पदाचे नाव , पदश्रेणी, पदसंख्या, वेतनश्रेणी, अर्हता व आरक्षण खालील प्रमाणे.**

**i) पदाचे नाव :-** विधी अधिकारी , **पदश्रेणी** :- 'ब' वर्ग , **एकूण पदे** :- १
**वेतनश्रेणी :-** ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रुपये ४४००/-
**अर्हता :-** मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी, एल.एल.बी. व ५ वर्ष दिवाणी / फौजदारी न्यायालयात काम केल्याचा अनुभव **किंवा** मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी व विधी सहाय्यक या पदावर काम केल्याचा अनुभव.
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | एकूण | १ | - | - | - | - | - | - | १ |

**ii)पदाचे नाव :-** उद्यान तपासणीस, **पदश्रेणी** :- 'ब' वर्ग , **एकूण पदे** :- १
**वेतनश्रेणी :-** ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रुपये ४४००/-
**अर्हता :-** बी.एस.सी. ॲग्री. किंवा डिप्लोमा इन ॲग्री.
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | खुले | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | एकूण | १ | - | - | - | - | - | - | १ |

**iii)पदाचे नाव :-** कनिष्ठ अभियंता (विद्युत), **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- ३
**वेतनश्रेणी :-** ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रुपये ४४००/-
**अर्हता :-** बी.ई.विद्युत वा तत्सम् पदवी अथवा डी.ई.ई. किंवा तत्सम् विद्युत शाखेतील पदविका.
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | इमाव | १ | - | - | - | - | - | - | १ |
| २) | खुले | १ | - | - | १ | - | - | - | २ |
| | एकूण | २ | - | - | १ | - | - | - | ३ |

**iv)पदाचे नाव :-** कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- २
**वेतनश्रेणी :-** ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रुपये ४४००/-
**अर्हता :-** बी.ई.यांत्रिकी वा तत्सम् पदवी अथवा डी.एम.ई. किंवा तत्सम् यांत्रिकी शाखेतील पदविका.
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| २) | इमाव | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | एकूण | २ | - | - | - | - | - | - | २ |

**v)पदाचे नाव :-** कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल), **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- १
**वेतनश्रेणी :-** ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रुपये ४४००/-
**अर्हता :-** ऑटोमोबाईल पदवी वा तत्सम् पदवी अथवा डी.एम.ई. अधिक पोस्ट डिप्लोमा इन ऑटोमोबाईल पदवीका
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | इमाव | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | एकूण | १ | - | - | - | - | - | - | १ |

**vi)पदाचे नाव :-** विधी सहाय्यक, **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- ७
**वेतनश्रेणी :-** ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रुपये ४२००/-
**अर्हता :-** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी, एल.एल.बी. व तीन वर्षे दिवाणी / फौजदारी न्यायालयात काम केल्याचा अनुभव.
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| २) | अनु.जमाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ३) | भज-क | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ४) | इमाव | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ५) | खुले | २ | - | - | १ | - | - | - | ३ |
| | एकूण | ६ | - | - | १ | - | - | - | ७ |

**vii)पदाचे नाव :-** विशेष शिक्षक- मतिमंदाकरीता (जिद्द शाळा), **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- ७
**वेतनश्रेणी :-** ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रुपये २८००/-
**अर्हता :-** पदवीधर, प्रशिक्षित केंद्रीय कायदा १९९२ अन्वये विशेष शिक्षक हे प्रशिक्षित असणे बंधनकारक. तद्वतच त्यांनी घेतलेले प्रशिक्षण हे आर.सी.आय. ने मान्यता दिलेल्या प्रशिक्षण संस्थेतून घेतले असावे आणि त्यांनी आर.सी.आय.कडे आवश्यक नोंदणी करणे आवश्यक.
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जमाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| २) | भज-क | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ३) | खुले | ३ | - | - | १ | - | - | १ | ५ |
| | एकूण | ५ | - | - | १ | - | - | १ | ७ |

**viii)पदाचे नाव :-** उपस्थानक अधिकारी (क्वालि.), **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- ९
**वेतनश्रेणी :-** ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रुपये २८००/-
**अर्हता :-** मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर, मुंबई विद्यापीठाच्या पदवीधरास प्राधान्य व राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय, नागपूर येथील उपस्थानक अधिकारी पाठ्यक्रम उत्तीर्ण.
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| २) | अनु.जमाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ३) | भज-क | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ४) | इमाव | २ | - | - | - | - | - | - | २ |
| ५) | खुले | ३ | - | - | - | - | - | १ | ४ |
| | एकूण | ८ | - | - | - | - | - | १ | ९ |

**ix)पदाचे नाव :-** वाहन चालक , **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- ७५
**वेतनश्रेणी :-** ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रुपये २७००/-
**अर्हता :-** इयत्ता १० वी पास, जड व हलके वाहन चालवण्याचा परवाना, ३ वर्षाचा वाहन चालकाचा अनुभव
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जाती | ०४ | - | - | - | - | - | ०१ | ०५ |
| २) | विजा-अ | २ | - | - | - | - | - | - | ०२ |
| ३) | भज-ब | १ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ४) | भज-क | १ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ५) | भज-ड | १ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ६) | इमाव | १६ | १ | १ | - | २ | १ | ०४ | २५ |
| ७) | खुले | २५ | २ | १ | - | ४ | २ | ०६ | ४० |
| | एकूण | ५० | ३ | २ | - | ६ | ३ | ११ | ७५ |

**x)पदाचे नाव :-** वायरमन , **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- १२
**वेतनश्रेणी :-** ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रुपये २०००/-
**अर्हता :-** आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन ट्रेड व ३ वर्षाचा अनुभव **किंवा** वायरमन लायसन्स व कामाचा ५वर्षाचा अनुभव
**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जाती | ३ | - | - | - | - | - | - | ३ |
| २) | अनु.जमाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ३) | विजा-अ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ४) | भज-ब | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ५) | भज-क | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ६) | इमाव | ३ | - | - | - | - | - | - | ३ |
| ७) | खुले | २ | - | - | - | - | - | - | २ |
| | एकूण | १२ | - | - | - | - | - | - | १२ |

**xi)पदाचे नाव :-** फायरमन , **पदश्रेणी** :- 'क' वर्ग , **एकूण पदे** :- ४७
**वेतनश्रेणी :-** ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रुपये २०००/-
**अर्हता :- १.**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.) **२.**राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण.

**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जाती | ९ | १ | - | - | १ | १ | २ | १४ |
| २) | भज-क | ३ | - | - | - | - | - | १ | ०४ |
| ३) | भज-ड | १ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ४) | इमाव | १० | १ | - | - | २ | १ | ३ | १७ |
| ५) | खुले | ६ | १ | - | - | १ | १ | २ | ११ |
| | एकूण | २९ | ३ | - | - | ४ | ३ | ८ | ४७ |

**xii)पदाचे नाव :-** वॉर्डबॉय, **पदश्रेणी** :- 'ड' वर्ग , **एकूण पदे** :- ४४
**वेतनश्रेणी :-** ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रुपये १९००/-
**अर्हता :-** १० वी पास व रुग्णालयातील कामाचा अनुभव आवश्यक.

**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | विजा-अ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| २) | भज-ब | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ३) | भज-क | १ | - | - | १ | - | - | - | २ |
| ४) | भज-ड | १ | - | - | १ | - | - | - | २ |
| ५) | इमाव | ३ | १ | - | ४ | १ | १ | २ | १२ |
| ६) | खुले | ८ | १ | १ | ८ | ३ | १ | ४ | २६ |
| | एकूण | १५ | २ | १ | १४ | ४ | २ | ६ | ४४ |

**xiii) पदाचे नाव :-** लाईटचेकर, **पदश्रेणी** :- 'ड' वर्ग , **एकूण पदे** :- ६
**वेतनश्रेणी :-** ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रुपये १९००/-
**अर्हता :-** इयत्ता ७ वी पास.

**आरक्षण :-**

| अ.क्र | प्रवर्ग | इतर ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | महिला | अंश कालीन | खेळाडू | माजी सैनिक | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| २) | भज-क | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ३) | इमाव | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ४) | खुले | ३ | - | - | - | - | - | - | ३ |
| | एकूण | ६ | - | - | - | - | - | - | ६ |

## २.वयोमर्यादा

१. उपरोक्त पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या १२, दि.२५/०४/२०१६ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

२. शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दि.१ नोव्हेंबर २००३ नुसार नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शासन सेवतील अधिकारी/कर्मचारी यांचे करीता वयाची अट पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार वयाच्या ४५/५० पर्यंत राहील.

३. शासन निर्णय क्र.प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि.०३/०२/२००७ नुसार प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील.

४. स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य यांचेसाठी गट "क" व गट "ड" वर्गीय पदांकरीता विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.निवक -१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.०६/१०/२०१० प्रमाणे वयाची कमाल मर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील.

५. शासन निर्णय क्र. पअंक१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ,दि.२७/१०/२००९ नुसार पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार असल्यास वयाची कमाल मर्यादा ४६ वर्षे राहील.

६. शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.०१/०७/२०१६ नुसार खेळाडू उमेदवारांना वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील.

७. उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणाऱ्या विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासप्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादेतील सवलती, शुल्कामधील सवलतीशिवाय कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.

८. ठाणे महानगरपालिकेच्या स्थायी (कायम) कर्मचाऱ्यांना वयाची अट लागू राहणार नाही.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सूचना महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्याचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करुन अर्ज करावेत.

**३. शैक्षणिक अर्हतेबाबतच्या अटी व शर्ती**

१. प्रस्तुत जाहिरातीत पद निहाय नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव उमेदवाराने जाहिरातीच्या दिनांकास प्रमाणपत्रांसहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/२०११/१३, दिनांक २३/८/२०११ मधील आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठ,अभिमत विद्यापीठ,स्वायत्त संस्था इत्यादींच्या विविध पदविका,पदवी व पदव्युत्तर पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभाग(शिक्षण विभाग) मंत्रालयाकडून केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळावेळी प्रदान केलेली व भविष्यात प्रदान केली जाणारी समकक्षता ठाणे महानगरपालिकेच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

३. विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या विद्यापीठ/अभिमत विद्यापीठ(Deemed university) अथवा विद्यापीठ अनुदान आयोग अथवा AICTE ने मान्यता दिलेल्या स्वायत्त संस्थामधील शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

४. स्वायत्त संस्थांचे कोर्स हे भारतातील विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या कोर्सशी समकक्ष असणे आवश्यक आहे.

५. सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना संबंधित केंद्रीय मान्यता मंडळाची त्या त्या संस्थेत/महाविद्यालयात/विद्यापीठात अभ्यासक्रम चालविण्याची मान्यता असणे आवश्यक आहे.

६. संशोधनाच्या पदव्यांना त्या त्या विद्यापीठ/अभिमत विद्यापीठात /स्वायत्त संस्थेत असे संशोधन अभ्यासक्रम चालविण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता असणे आवश्यक आहे.

७. संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यासच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या अर्हता स्वीकारार्ह असतील.

८. मान्यताप्राप्त विद्यापीठाबाबत उमेदवाराने धारण केलेली शैक्षणिक पात्रता ही केंद्रशासन व राज्यशासन यांचेकडील तदनुषंगिक आदेश,निर्णयाप्रमाणे असणे आवश्यक आहे.

**४.अर्ज, अर्हता,परिक्षा शुल्क इत्यादी:**

१. ऑनलाईन पध्दतीशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेला दिनांक व वेळेनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

२. महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यापुर्वी आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांची पुर्व परवानगी घ्यावी व तसे ना हरकत प्रमाणपत्र, प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

३. अर्ज करणा-या उमेदवारांनी जाहिरातीचे दिनांकास, ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाच्या आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता धारण करणे / अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४. कोणत्याही उमेदवाराने एकाच पदासाठी एका पेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास त्यामधील अर्जाची फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राहय धरण्यात येईल व इतर नोंद झालेल्या अर्जाची फी जप्त करण्यात येईल.

५. ऑनलाईल अर्ज www.thanecity.gov.in व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळाव्दारे दिनांक २६/११/२०१६ ते १५/१२/२०१६ या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

६. सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,जिल्हा सैनिक मंडळाकडील सदर उमेदवारांनी तसेच प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर वरील मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.अथवा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

७. उपरोक्त पदांसाठी विहित केलेले अर्ज www.thanecity.gov.in व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दि. २६/११/२०१६ ते १५/१२/२०१६ पर्यंत उपलब्ध होतील.

**परिक्षा शुल्क :**

१. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.८००/-
२. मागास / इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. ४००/-
३. माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.
४. परीक्षा शुल्क भरल्याबाबतची बँक चलनाची प्रत कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**५.सामाजिक व संमातर आरक्षणाबाबतः-**

१. जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ उमेदवाराने महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदींनूसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
२. उमेदवाराने अर्जामध्ये जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.
३. विमुक्त जाती (अ) ,भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क ),भटक्या जमाती (ड ),विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणा-या (या प्रवर्गातील समांतर आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांसह) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.
४. शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र सीबीसी-२०१३/प्र.क्र. १८२/ विजा/भज-१. दिनांक १७/०८/१३, अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.
५. खेळाडूंच्या आरक्षण व वयोमर्यादेसाठी उमेदवारांनी शालेय शिक्षण वा क्रीडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. राक्रीधो/२००२/प्रक्र ६८/क्रीयुसे/२ दि.१/०७/२०१६ मध्ये देण्यात आलेल्या सर्व समावेशक सुचनांचे अवलोकन करावे.
६. माजी सैनिक, बडतर्फीने गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजाधिष्ट अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.
७. वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना राहतील.
८. समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एस.आर.व्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि.१३/०८/२०१४ अन्वये आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.
९. समांतर आरक्षणांतर्गत राखीव असलेल्या पदांकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षणविरहित म्हणून भरली जातील.

**महिलांसाठीचे आरक्षण**

१. महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्र ८२/२००१/मसेअ २००० /प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.
२. महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवाशी असावा.
३. महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी संमातर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरिता आरक्षित पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत, तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.
४. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांपैकी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/ कुटंबातील (क्रिमी लेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्गीय , भटक्या जमाती-क आणि भटक्या जमाती-ड या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.
५. महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या महिला अमेदवारांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.
६. खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदांसाठी दावा करणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी महानगरपालिकेतर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली आहे त्या वर्षाच्या लगत पूर्वीच्या वित्तीय वर्षातील, क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले खुल्या प्रवर्गातील महीलांकरीताचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (NCL) कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. त्यापुर्वीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.
७. शासन परिपत्रक , सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सी बीसी- २०१३/प्र.क्र.१८२/ विजाभज-१,दि.१७/८/२०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

**६. इतर सर्वसाधारण अटी/ शर्ती/सूचना:**

१. पात्रता / आरक्षणासंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे. अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्टयर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/ आरक्षणाचा दावा ग्राह्य समजला जाणार नाही.
२. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक असणा-या प्रवर्गातील उमेदवार यांनी ते उन्नत व प्रगत गटाबाहेरील आहेत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. असे नमूद केलेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या दिनांकापर्यंत निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. अर्जामध्ये उन्नत व प्रगत गटाबाहेरील नाही असे नमूद केले असल्यास, नंतर सादर करण्यात आलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र निवडीसाठी ग्राहय धरले जाणार नाही.
३. उमेदवाराने अर्जामध्ये स्पष्टपणे होय/(yes) असे नमूद केले असल्यास कागदपत्र पडताळणीच्या दिनांकापर्यंत निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र अंशकालीन असल्याबाबत दाखला व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडील अंशकालीन अनुभवाच्या नोंदणीबाबतचे प्रमाणपत्र प्रकल्पग्रस्त दाखला, भूकंपग्रस्त दाखला निवडीसाठी ग्राहय धरण्यात येईल. अर्जामध्ये संबंधित बाबींचा/ आरक्षणाचा स्पष्टपणे उल्लेख/दावा केलेला नसल्यास, तदनंतर अथवा पडताळणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रांचा/ प्रमाणपत्रांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही. व त्याबाबतच्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.
४. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराने कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल. अर्जदाराकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. परंतू सदर जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला यांमध्ये अर्जदाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

५. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठक व्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त सूची, अंतिम निवड व अतिरिक्त सुची व इतर सर्व सूचना हया वेळावेळी www.thanecity.gov.in व https://maharecruitment. mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रीया पुर्ण होईपर्यत वेळोवेळी संकेतस्थळावरील सुचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

६. उपरोक्त पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ नुसार संगणक हाताळणीबाबतची शासनाने विहित केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल. माहिती व तंत्रज्ञान (साप्रवि) विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये विहित केलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सगंणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

७. निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्वावर नियुक्तीनंतर ठाणे महानगरपालिका सेवा विनियम लागू होतील.

८. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन , वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/सेवा -४ दि.३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना ( Defined contribution Pension System) लागु राहील.

९. शासन निर्णय क्र. संकिर्ण/२००७/पडताळणी /नवि-२६ दि.२१/११/२००७ अन्वये निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही, असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच उमेदवाराची नेमणूक केली जाईल.

१०. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही-२०००/प्रक्र१७/२०००/२०१२ दि. १/०७/२००५ नुसार लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

११. नियुक्ती नंतर उमेदवाराची महापालिकेच्या रुग्णालयामार्फत वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीय दृष्टया अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१२. उमेदवारांस मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१३. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल.अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

१४. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व ऑनलाईन परीक्षेच्या वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्यांचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१५. महापालिकेने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी पात्र उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१६. सदर भरती अंतर्गत नियुक्ती दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (नैमत्तिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा/अनुपस्थितीचा कालावधी वगळून ) असेल व दोन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

१७. निवड झालेल्या उमेदवारांची ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदलीयोग्य असेल.

१८. भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त ,ठाणे महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

१९. निवड झालेल्या उमेदवारांना महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाची राहणार नाही याची नोंद घ्यावी.

२०. या भरतीप्रक्रिये संदर्भातील माहिती व सूचना ठाणे महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया www.thanecity.gov.in व https://maharecruitment. mahaonline.gov.in वरील वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

२१. उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी ठाणे महानगरपालिकेकडून कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनूसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल, प्रसिध्दी पत्रक, इत्यादी सर्वसाधारणपणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. त्याकरिता उमेदवाराने वेळोवेळी महानगरपालिकेचे वेबसाईटचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील.

२२. महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितांवर बंधनकारक असतील.

२३. सामाजिक आरक्षण , समांतर आरक्षण, मागासप्रवर्ग/ नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र , भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, महिला, अंशकालीन, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या/ येणा-या शासन निर्णयाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात येईल.

**७. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-**

१. उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.thanecity.gov.in व https://maharecruitment. mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील.

२. पात्र उमेदवाराला वेब बेस (Web-based) ऑनलाईन अर्ज दिनांक २६/११/२०१६ ते १५/१२/२०१६ या कालावधीतच www.thanecity.gov.in व https://maharecruitment. mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

३. अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणा-या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

४. वय, शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग/नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन, महिला, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादि संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

५. वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल.

६. एस.एस.सी./मॅट्रीक्युलेशन अथवा शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला या प्रमाणपत्रावरील जन्मदिनांकानुसार अर्जामध्ये जन्मदिनांक निवडावा. स्त्री/पुरुष संदर्भात संबंधित पर्याय निवडावा. तसेच अमागास (खुला), मागास, नॉन-क्रिमिलेअर,महिला, माजी सैनिक, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन इत्यादि संदर्भात लागू असलेली माहिती निवडावी.

७. शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती, दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

८. गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

१.प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे
२.अर्ज सादरीकरण
३.शुल्क भरणा

**प्रोफाईलनिर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.**

१. https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.
२. प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:चाच ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.
३. उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रियेदरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे.
४. वरील प्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वत:च्या Login व Password द्वारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती , संपर्क तपशील, इतर माहिती , शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.
५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-
नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५से.मी. x उंची ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी.
   १) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकीत करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून स्कॅन करता येईल.
   २) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.




   ३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.
   ४) विहित आकार / क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या पेनाने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.
   ५) उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.अन्य कोणत्याही व्यक्तिने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.
   ६) वरील प्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी.संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.
   ७) फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेजची स्कॅन करुन jpg फॉरमेटमध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटो तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी ५० kb पेक्षा जास्त असता कामा नये. या पेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्विकारली जात नाही. इमेजची साईज ५०kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no. of colours etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी setting Adjust करावे.
   ८) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र/ हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परिक्षेच्या वेळी , प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरतांना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

६. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतःच करणे आवश्यक आहे.

७. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती CAPITAL LETTERS मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abbrevations) वा अद्याक्षरे ( Initials) न देता संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

८. महिला उमेदवारांनी पुर्वाश्रमीच्या नावाने ( By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

९. एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावांत कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास,त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

१०. पत्रव्यवहाराचा स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा व्यवसायीक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

११. अर्जामधील दावा/माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.

१२. संबंधीत पदाच्या / परिक्षेच्या जाहिरात / अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपुर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पुर्ण होईल.

१३. एकाहुन अधिक सेवेच्या / पदाच्या अथवा इतर परिक्षा एकाच दिवशी असल्यास उमेदवारांने याबाबत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.परिक्षेचा दिनांक, वेळ,केंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही. तसेच भरलेल्या शुल्काचा परतावा देखील करता येणार नाही.

१४.वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. या शिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

१५.उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चूकल्यास त्यास केवळ उमेदवार जबाबदार राहील.

१६. उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेश पत्रावर / उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑन लाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

१७.पूर्णतः माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट परिक्षेच्या वेळी तसेच कागदपत्र तपासणीच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

१८. अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाननी शिवाय ऑनलाईन परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार ऑन लाईन परिक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ ऑन लाईन परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

१९. भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्या अनुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.thanecity.gov.in व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल, या व्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२०. विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

२१. ऑनलाईन प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास ०२२-६१३१६४०३ या दुरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ते रात्री ८.००, शनिवार व रविवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत संपर्क साधावा किंवा अर्ज भरण्यासंबंधी, प्रवेशपत्र उपलब्ध होण्यासाठी support@mahaonline.gov.in यावर ई-मेल पाठविल्यानंतर उमेदवारांना त्यांच्या अडचणीचे निराकरण करुन उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर किंवा ई-मेल आयडीवर संदेश पाठविण्यात येईल. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी अचूकपणे भरणे अनिवार्य आहे.

२२.उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत कार्यरत असणे आवश्यक आहे.उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND ) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील, तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनीवर संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना ठाणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. प्रवेशपत्र डाउनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

**८. अर्ज सादरीकरण :-**

१. https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर वापरकर्त्याने स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डद्वारे यशस्वीरीत्या प्रवेश (Login) केल्यानंतर " ऑन लाईन अर्ज " येथे क्लिक करावे. जाहिरातीद्वारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या पदाच्या उजवीकडे असलेल्या " अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या ठिकाणी क्लिक करावे.

३. उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पुर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

४. जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पुर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहीत होऊ शकत नाही, असा संदेश यंत्रणा प्रदर्शीत करेल. अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरीत्या जतन झाला, असा संदेश यंत्रणा प्रदर्शीत करेल.

५. "रक्कम भरा" या पर्यायावर क्लिक करुन अर्जदाराला क्रेडीट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बॅंकिंगद्वारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करुन भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे, संग्राम केंद्र / सीएससी (नागरीक सेवा केंद्र) येथे चलनाद्वारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्विकारु शकेल.

६. https://maharecruitment.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलब्ध आहे.

**९. शुल्कभरणा :-**

यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

१. शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्याभागावरील "माझे खाते " या लिंकवर क्लिक करावे.

२. "माझे खाते" या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "unpaid" असे लिहिलेले असेल त्या ठिकाणी "Pay now" अशी लिंक उपलब्ध असेल.

३. "Pay now" या लिंकवर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंन्ट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

४. क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेट बँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंन्ट करता येईल.

५. नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापुर्वी पुर्ण करणे आवश्यक राहील.

६. ज्या उमेदवारांना इंटरनेटद्वारे स्वतः अर्ज भरावयाचा नसेल असे उमेदवार महा ई-सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज करु शकतात. त्या वेळी उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व सेवा केंद्राचे शुल्क घेतले जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती महा ई-सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो / स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडून आकारली जाईल.

७. चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

८. भारतीय स्टेट बँकमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

९. चलनाद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरताना परीक्षा शुल्क अधिक बँकेचे सेवाशुल्क भरावे लागतील.

**१०. ऑनलाईन परीक्षा :-**

१. जाहिरातीत नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक पदासाठी ऑनलाईन परीक्षा वेगवेगळी घेण्यात येईल.

२. परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित/बुध्दीमत्ता चाचणी व विषयज्ञान या विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर परिक्षेचा दर्जा हा संबधित पदाकरीता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पुरक राहील.

३. ऑनलाईन परीक्षा ही त्या पदाची शैक्षणिक अर्हता, कामाचे स्वरुप, तांत्रिक ज्ञान यांचेशी संबंधीत राहील.

| अ. क्र | पदनाम | परिक्षेचे विषय | लेखी परिक्षेचे गुण व परिक्षेचा कालावधी | व्यवसायीक चाचणीचे गुण | शारिरीक क्षमता चाचणीचे गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | विधी अधिकारी | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व विषयज्ञान | २०० (२ तास) | - | - | २०० |
| २. | उद्यान तपासणीस | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व विषयज्ञान | २०० (२ तास) | - | - | २०० |
| ३. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व विषयज्ञान | २०० (२ तास) | - | - | २०० |
| ४. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व विषयज्ञान | २०० (२ तास) | - | - | २०० |
| ५. | कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल) | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व विषयज्ञान | २०० (२ तास) | - | - | २०० |
| ६. | विधी सहाय्यक | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व विषयज्ञान | २०० (२ तास) | - | - | २०० |
| ७ | विशेष शिक्षक- मतिमंदाकरीता (जिद्द शाळा) | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व विषयज्ञान | २०० (२ तास) | - | - | २०० |
| ८ | उपस्थानक अधिकारी (क्वालि.) | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व विषयज्ञान | १२० (१ तास १५ मिनिटे) | - | ८० | २०० |
| ९ | वाहन चालक | मराठी, सामान्य ज्ञान व विषयज्ञान | १२० (१ तास १५ मिनिटे) | ८० | - | २०० |
| १० | वायरमन | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विषयज्ञान | २०० (२ तास) | - | - | २०० |
| ११ | फायरमन | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विषयज्ञान | १२० (१ तास १५ मिनिटे) | - | ८० | २०० |
| १२ | वॉर्ड बॉय | मराठी, सामान्य ज्ञान व विषयज्ञान | १०० (१ तास) | - | - | १०० |
| १३ | लाईट चेकर | मराठी, सामान्य ज्ञान | १०० (१ तास) | - | - | १०० |

४.प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील.

१. जाहिरातीत नमूद पदांकरिता अर्ज केलेल्या ऑनलाईन परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र www.thanecity.gov.in व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन परीक्षेच्या किमान ८ (आठ) दिवस अगोदर

टाकण्यात येतील(अपलोड करण्यात येतील). उमेदवारांनी संकेतस्थळावरुन ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र स्वत: काढुन घ्यावे. प्रवेशपत्राव्दारे उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेचा दिनांक, वेळ व परिक्षा केंद्र या बाबतची माहिती प्राप्त होईल.तसेच उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर परिक्षेचा दिनांक व वेळ या बाबत संदेश पाठविण्यात येईल.

२. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे बंधनकारक आहे, त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रवेशपत्र स्वत:जवळ जपून ठेवावे.

३. काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परिक्षेच्या तारखांमध्ये/ परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.thanecity.gov.in व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. उमेदवाराने लेखी परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करण्यासंबंधी केलेल्या विनंतीचा विचार करण्यात येणार नाही.

**११. शारिरीक पात्रतेची किमान अर्हता व शारिरीक क्षमता चाचणी** (उपस्थानक अधिकारी (क्वालि.) व फायरमन या पदांकरिता)

अ. शारिरीक पात्रतेची किमान अर्हता

१.उंची १६५ से.मी., २. वजन ५० कि.ग्रॅ.

३.छाती ८१ से.मी. न फुगवता , ८६ से.मी. फुगवून (Minimum Expansion 5 cms),

४.दृष्टी चांगली

ब. शारिरीक क्षमता चाचणी

१). जमिनीपासुन ३३ फुट उंचीवरील खिडकीस लावलेल्या (४६.४' वरील उंचीच्या) अल्युमिनीयम एक्सटेन्शन शिडी वर खिडकीपर्यंत वर चढुन त्याच शिडीने खाली उतरावे लागेल. (आरंभ रेषेपासुन शिडी २० फुट अंतरावर असेल.) (एकुण गुण -४०)

| वेळ (सेकंदामध्ये ) | गुण |
|---|---|
| २० सेकंदापेक्षा कमी | ४० गुण |
| २०.१ सेकंद ते ३० सेकंद | २५ गुण |
| ३०.१ सेकंद ते ४० सेकंद | १० गुण |
| ४० सेकंदापेक्षा जास्त | शुन्य गुण |

२). ५० कि. ग्रॅ. वजनाची मानवकृती खांद्यावर घेऊन ६० मीटर अंतर धावणे (एकुण गुण -२०)

| वेळ (सेकंदामध्ये) | गुण |
|---|---|
| २० सेकंदापेक्षा कमी | २० गुण |
| २०.१ सेकंद ते ३० सेकंद | १० गुण |
| ३०.१ सेकंद ते ४० सेकंद | ५ गुण |
| ४० सेकंदापेक्षा जास्त | शुन्य गुण |

३). २० फुट उंचीपर्यंत रस्सीवर चढणे व उतरणे ( रस्सीवर चढतेवेळी फक्त हाताचा वापर करणे बंधनकारक राहील. पायाचा वापर करता येणार नाही. केल्यास शुन्य गुण मिळेल.)(एकुण गुण -२०)

| चढलेले अतंर | गुण |
|---|---|
| पुर्ण रस्सी | २० गुण |
| ३/४ रस्सी | १४ गुण |
| १/२ रस्सी | ६ गुण |
| अर्ध्यापेक्षा कमी अंतर | शुन्य गुण |

**महत्वाची सुचना :-** उपरोक्त नमुद केलेल्या शारिरीक मोजमाप व मैदानी चाचण्यापैकी कोणत्याही एका मोजमापामध्ये / चाचणी मध्ये उमेदवार अपात्र ठरल्यास पुढील उर्वरीत चाचण्या घेण्यात येणार नाहीत व त्याला निवड प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल . सदर कामी संबधित चाचण्या घेण्यासाठी नेमणुक करण्यात आलेल्या नियंत्रण अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहिल.

**१२. ओळख पटवणे**

१. परिक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मुळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (pan card) / पारपत्र ( passport) / वाहनचालक परवाना (Driving License ) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधार कार्ड / फोटोसहीतचे पासबुक / कर्मचारी ओळखपत्र/ फोटो सहीत असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक / पर्यवेक्षकाला सादर

करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक /उपस्थितीपत्रक आणि त्यांने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटवली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परिक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**टिप :-** उमेदवाराने परिक्षेला उपस्थित राहताना स्वत:चे ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परिक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव ( परिक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या /मधल्या/ शेवटच्या नावांत विवाहानंतर बदल घडला असेल त्यांनी याबाबत विषेश खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र या पैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परिक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परिक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

२. परिक्षेला उशिरा येण्याबाबत- परिक्षेच्या प्रवेशपत्रात परिक्षेला हजर राहणेसाठी दिलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परिक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परिक्षेसाठी लॉग-इन करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परीक्षा स्थळावर उपस्थित रहावे लागेल.

**१३. परिक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवार ,**

१. अनुचित प्रकार करणे किंवा
२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा
३. परिक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परिक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पुर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशीत करणे, पाठवणे, साठवणे, किंवा
४. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा
५. स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठींबा मिळविणे किंवा
६. भ्रमणध्वनी किंवा तत्सम दळणवळणाची इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परिक्षेच्या ठिकाणी करणे.

अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास गुन्हेगारी कारवाईस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास

१. तो ज्या परिक्षेला बसणार आहे त्या परिक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.
२. ठाणे महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणा-या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालवधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल. जर उमेदवार ठाणे महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

**१४. निवड पध्दत:**

१. जाहिरातीमध्ये नमूद पदांकरिता उमेदवारांची निवड ऑनलाईन परिक्षेमध्ये मिळणा-या एकूण गुणाच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल. ज्या पदांकरीता व्यवसायीक चाचणी, शारीरिक क्षमतेची चाचणी विहीत केली आहे अशा पदांकरीता उमेदवारांची निवड ऑनलाईन परिक्षा, व्यावसायीक चाचणी व शारीरिक क्षमतेची चाचणी यांमध्ये मिळणा-या एकूण गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल.

२. आनॅलाईन परिक्षेमध्ये किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना व्यवसायीक चाचणी / शारिरिक क्षमता चाचणी करिता बोलविण्यात येईल.

३. ऑनलाईन परिक्षा झाल्यानंतर त्यादिवशी उत्तरतालिका (Answer key) www.thanecity.gov.in किंवा https://maharecruitment. mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. त्याबाबत उमेदवारांची हरकत असल्यास त्यांनी ३ दिवसांत https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर पाठवाव्यात. उमेदवारांकडून समक्ष हरकती स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच ई-मेल व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. त्या अनुषंगाने घेण्यात येणारे निर्णय अंतिम राहतील.

४. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

५. ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारानां मिळालेल्या गुणांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६. शासन निर्णय क्र. प्रानिमं/१२१४/(प्र.क्र.४३/१४/१३-अ,दि.०५/०६/२०१४ नुसार 'गट क' मधील कोणत्याही पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रीयेत पात्र झालेल्या उमेदवारांची ऑन लाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे तपासणी करीता पडताळणी समितीकडे उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

७. समान गुण असणा-या उमेदवारांचा गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं/ १२१५/(प्र.क्र.५५/१५)/१३-अ,दि.०५/१०/२०१५ मधील नमूद केलेल्या निकषावर लावला जाईल.

८. ऑन लाईन परीक्षेच्या निकालानंतर संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणा-या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल .त्याबाबतची यादी व वेळापत्रक ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. तसेच ई-मेलवर अथवा मोबाईवर मेसेजव्दारे कळविणेत येईल.

९. कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा ,अधिवास प्रमाणपत्र ,समांतर आरक्षणाबाबतचा दावा, बँक चलन इ.बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याची प्रत्येकी एक साक्षांकित प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१०. कागदपत्रे तपासणीनंतर निवडयादी व अतिरिक्त निवडयादी ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

११. प्रमाणपत्र तपासणी करीता येतेवेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वस्वाक्षांकित (Self Attested) छांयाकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१५. विशेष सूचना :**

१. महापालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे /अभिलेखे ही महापालिकेच्या अभिलेखाचा भाग होईल .
२. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
३. मध्यस्थ/ठग/ठाणे महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
४. यापुर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरुन पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे.
५. उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चूकीची माहिती / तपशिल देऊ नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑन लाईन अर्ज भरतांना दडवून ठेवू नये.

सही /-
महापालिका आयुक्त
ठाणे महानगरपालिका,ठाणे